# भोकर येथे विजेच्या धक्क्याने गोठ्यातील दुभती गाय दगावली

## सुदैवाने दोन गायी व आजी बचावल्या, महावितरणाच्या गलथानपणामुळे घडली दुर्घटना

**भोकर (वार्ताहर)**– श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे गायींच्या गोठ्यावर महावितरणची वीज वाहक तार तुटून पडल्याने विजेच्या धक्क्याने एक दुभती गाय दगावली तर दोन गायी व एक आजी मात्र शेजाऱ्याच्या प्रसंगावधानामुळे बचावल्या. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे ७० हजारांचे नुकसान झाले आहे.

श्रीरामपूर-नेवासा या राज्य मार्ग क्र. ५० च्या लगत भोकर शिवारातील गट नं. २१२ मध्ये वस्ती करून राहत असलेले भाऊसाहेब पंढरीनाथ लोखंडे यांच्या घराजवळच राज्य मार्गालगत गायींचा गोठा आहे. या गोठ्यावरून भोकर गावठाणसह तीन फिडरला वीजपुरवठा करणाऱ्या वीज वाहक तारा गेलेल्या आहेत. दुपारी दोन वाजेच्या सुमारास महावितरणच्या वीजवाहक तारांपैकी एक वीज प्रवाह सुरू असलेली तार घर्षण होवून तुटून लोखंडे यांच्या गायींच्या गोठ्याच्या कंपाऊंडवर पडली व काही क्षणात या गोठ्यात बांधलेल्या तीनही गायींना विजेचा जोरदार धक्का बसला. त्यात दोन गायी जखमी झाल्या तर एका दुभत्या गायीचा जागीच मृत्यू झाला. याठिकाणी त्यांच्या



भोकर येथे महावितरणची तार तुटून भाऊसाहेब लोखंडे यांचे गायीच्या गोठ्याच्या कंपाउंडवर पडली. , (छाया– भानुदास बेरड)

कुटुंबातील चार माणसे होती. हा प्रकार ६५ वर्ष वयाच्या कुसूमबाई पंढरीनाथ लोखंडे यांच्या लक्षात येताच त्या घाईने या गायी का पडल्या हे पाहण्यासाठी सरसावल्या मात्र जवळच असलेले भास्कर अभंग यांनी कुसूम आजी यांना मागे ओढल्याने त्या बचावल्या अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. याबाबत भाऊसाहेब लोखंडे यांनी तातडीने महावितरणला दुर्घटना घडल्याचे कळविले. या दुर्घटनेचे वृत्त कळताच महावितरणच्या भोकर सबस्टेशनचे कनिष्ठ अभियंता गिरीष मुळे, त्यांचे सहाय्यक संभाजी पटारे व ऋषी तगरे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी लोखंडे परीवारांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला मात्र अनेकदा सांगूनही या ठिकाणच्या झाडांच्या फांद्या तोडल्या नाही, लेखी अर्ज देवूनही या वीज वाहक तारांना गार्डींग अर्थात संरक्षक तार न बसल्यानेच ही दुर्घटना घडल्याने संतप्त झालेल्या लोखंडे परीवाराने आमची सत्तर हजारांची गाय मृत्यू पावली, त्याची नुकसान भरपाई द्या त्या शिवाय येथील वीज वाहक तार सुरळीत करू दिली जाणार नाही असा आक्रमक पवित्रा घेतला.

दरम्यान घटनेचे गांभीर्य व उन्हाची दाहकता तसेच गावठाणसह शेतीचे फिडरही बंद राहणार असल्याने काहींनी मध्यस्थी करत काही वेळाने वीजपुरवठा सुरळीत झाला.

यानंतर येथील तालुका पशुवैद्यकीय अधिकारी अनिल भांड यांनी तातडीने दुर्घटनास्थळी येवून गायीचे शवविच्छेदन केले. यावेळी उपसरपंच संदीप गांधले, जगन्नाथ लोखंडे, भास्कर अभंग, रावसाहेब लोखंडे, नानासाहेब लोखंडे, आप्पासाहेब लोखंडे, भानुदास बेरड व रफीक शेख आदींसह अनेकांनी भेट देत या कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी गिरीष मुळे यांनी नियमानुसार तातडीच्या मदतीसह नियमानुकुल मदत मिळवून देण्याचे व दोन दिवसांत याठिकाणी वीज वाहक तारांना संरक्षक तार लावण्यात येईल असे आश्वासन दिले. महावितरणच्या दुर्लक्षीतपणामुळेच ही दुर्घटना घडल्याची चर्चा नागरिकांत सुरू होती.

# १७ चेंडूत अर्धशतक, ३५ चेंडूत शतक

## वैभव सूर्यवंशीची १४ व्या वर्षी आश्चर्यकारक कामगिरी

**जयपूर**– राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यामध्ये सामना सुरु आहे. या सामन्यात गुजरात च्या संघाने प्रथम फलंदाजी करत दमदार फलंदाजी केली पण आता दुसऱ्या डावांमध्ये राजस्थानच्या दोन्ही सलामीवीर फलंदाजांनी त्यांना त्यांच्याच शब्दात उत्तर दिले आहे. या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा आणि आयपीएच्या इतिहासातील सर्वात तरुण १४ वर्षीय खेळाडूने काल आयपीएल २०२५ चे सर्वात जलद गतीने अर्धशतक झळकावले आहे. वैभव सूर्यवंशी याने काल १७ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. तर ३५ चेंडूत पहिले शतक झळकावले.



कालच्या सामन्यात जयपूरच्या सवाई मानसिंह मैदानावर वैभव सूर्यवंशी याने कालत्यांच्या करियरचे आयपीएलमधील पहिले अर्धशतक झळकवले आहे. वैभव सूर्यवंशी याने संघासाठी फक्त १७ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या. यामध्ये त्याने ६ षटकार आणि ३ चौकार मारले. त्याच्या या फलंदाजीने सर्वानाच चकित केले. २८ एप्रिल हा वैभव सूर्यवंशीसाठी ऐतिहासिक दिवस आहे, त्याने त्याच्या करियरची सर्वात सुंदर इनिंग खेळली आहे. १४ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने गुजरात टायटन्सविरुद्ध आश्चर्यकारक कामगिरी केली. त्याने त्याच्या करियरमधील सर्वात महत्वाचे त्याचबरोबर त्याच्या आयुष्यातील सर्वात सुंदर इनिंग खेळली आहे. त्याने आयपीएलमधील पहिले शतक फक्त ३५ चेंडूंमध्ये पूर्ण केले आणि सर्वात जलद गतीने शतक ठोकण्याच्या यादीमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. त्याने ११ षटकार आणि ७ चौकार मारले. आजच्या सामन्यात त्याने एकही गुजरात टायटन्सच्या गोलंदाजाला सोडलं नाही.

या सामन्यात गुजरात टायटन्सच्या संघाने पहिले फलंदाजी करून राजस्थान रॉयल्सविरुद्ध २०९ धावा केल्या होत्या. यामध्ये शुभमन गिल त्याचबरोबर जोस बटलर यांनी चांगली खेळी खेळली होती. त्यानंतर प्रत्युत्तरात यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी संघासाठी गुजरातच्या गोलंदाजांना धुतलं. या काळात त्याने मोहम्मद सिराजपासून ते इशांत शर्मा आणि वॉशिंग्टन सुंदरपर्यंत सर्वांच्या चेंडूवर अनेक षटकार मारले. इशांतच्या एका षटकात वैभवने २६ धावा काढल्या. यामध्ये तीन षटकार आणि दोन चौकारांचा समावेश होता. वैभव सूर्यवंशीची धोकादायक फलंदाजी पाहूनराजस्थानचे प्रशिक्षक राहुल द्रविड देखील खूप आनंदी दिसत होते.

वैभव सूर्यवंशीच्या धोकादायक फलंदाजीचा अंदाज यावरून येतो की त्याने एकाही जीटी गोलंदाजाला सोडले नाही. त्याच्या खेळीदरम्यान, वैभवने या सामन्यात आयपीएल पदार्पण करणाऱ्या करीम जन्नतचा डावही खराब केला. करीम जन्नतच्या पहिल्याच षटकात त्याने ३० धावा काढल्या. वैभवच्या खेळीचा उत्साह इतका होता की आतापर्यंत व्हीलचेअरवर बसलेला राजस्थानचा प्रशिक्षक राहुल द्रविडही उभा राहिला. त्याने दोन्ही हात वर करून वैभवचे मनोबल वाढवले. त्याने त्याच्या नावावर अनेक विक्रम केले आहेत. पहिला विक्रम म्हणजेच जेव्हा त्याने राजस्थान रॉयल्ससाठी पदार्पण केले होते त्यादिवशी तो सर्वात तरुण आयपीएलमध्ये खेळणारा खेळाडू ठरला होता. त्याचबरोबर त्याने फक्त १७ चेंडूंमध्ये ५१ धावा केल्या आणि आयपीएल २०२५ मध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा तो पहिला खेळाडू आहे. त्याचबरोबर आयपीएलच्या इतिहासातील सर्वात जलद शतक झळकावणारा दुसरा खेळाडू ठरला आहे यामध्ये पहिल्या स्थानावर क्रिस गेलं आहे.

# नगरमध्ये तृतीयपंथींच्यावतीने निदर्शने व निषेध

## अडकलेल्या नागरिकांना घर वापसीसाठी शासनाने मोफत सेवा द्यावी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– काश्मीर खोऱ्यातील पहेलगामजवळील बायसरण परिसरात झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तृतीयपंथी समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला. तसेच या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन करून अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष काजल गुरु समवेत लैला गुरु, सना, गौरी, फिजा, दिया, मीनाक्षी, मोहिनी, अदा, शिवण्या, रिजवाना, सुलताना, मीरा, आयत, रोशनी, तेजू, मनू, मीना, संध्या गुरु, मोहनी, साधना, शुभांगी, आकांक्षा आदीसह तृतीयपंथी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. जम्मू काश्मीर पहेलगाम येथे फिरण्यासाठी गेलेले नागरिक हे महाराष्ट्र व विविध राज्यातून आले होते. मात्र दहशतवादी हल्ल्यानंतर तेथे अडकून पडले व त्यांना घर वापसीसाठी काही विमान कंपन्यांकडून तिप्पट पैसे वसूल करण्यात आले, ही दुर्दैवी बाब. यामुळे अडकलेल्या नागरिकांना घरवापसीसाठी सरकारने मदत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# लाख येथील शेतकरी खाडे यांच्या मृत्यूप्रकरणी दोघांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)**– सामायिक बांधावर लावलेल्या तारेला विद्युत प्रवाह सोडल्याने त्याचा धक्का लागल्याने लाख येथील सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा तंटामुक्ती अध्यक्ष भास्कर भाऊसाहेब खाडे यांचा मृत्यू झाल्याची घटना



राहुरी तालुक्यातील लाख परिसरात सोमवार दि. २१ एप्रिल रोजी घडली होती. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोघा शेजाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत, अमोल संभाजी खाडे (वय ३३), धंदा-शेती यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आमची लाख शिवारात शेती असून शेजारी गयाबाई आढाव यांची शेती आहे. त्यांचा मुलगा संदीप आढाव याने शेताच्या सामायिक बांधाजवळ एक तार लावलेली असून तो त्या तारेत विद्युत प्रवाह सोडत असत. त्याला अनेकदा याबाबत सांगितले होते. मात्र तो ऐकत नसे. सकाळी १० च्या सुमारास माझे आजोबा भास्कर भाऊसाहेब खाडे हे उसाच्या खालच्या बाजूला पाणी पोहचले की नाही, हे पहायला गेले होते. त्या ठिकाणी विद्युत तारेला धक्का लागून ते बेशुद्ध पडले. बराच वेळ झाला आजोबा आले नाही म्हणून त्यांना पहायला गेलो असता, विद्युत तार त्यांना चिकटलेली होती. त्यानंतर कोणीतरी विद्युत पुरवठा बंद केल्यानंतर त्यांना तारेपासून बाजूला घेवून तातडीने रुग्णवाहिका बोलावून राहुरी येथे औषधोपचारासाठी नेले असता ते उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

याप्रकरणी अमोल खाडे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिसात गयाबाई भिमराव आढाव, संदीप भिमराव आढाव यांच्याविरूद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# कमलबाई मुथा यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– येथील जैन समाजातील ज्येष्ठ महिला श्रीमती कमलबाई गणपतलाल मुथा (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, दीर, पुतण्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील जैन श्रावक संघाचे सदस्य विजय मुथा यांच्या त्या मातोश्री तर सुभाष व प्रकाश मुथा यांच्या भावजयी, स्वप्नेश मुथा यांच्या चुलती होत. कै. कमलबाई मुथा यांची अंतिम यात्रा आज मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता रामजी बोरावकेनगर, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर येथील निवासस्थानावरून निघणार आहे.

# रामदास डावखर यांचे निधन



**मुसळवाडी (वार्ताहर)**– राहुरी तालुक्यातील लाख येथील रामदास हरिभाऊ डावखर (वय ७५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, एक बंधू, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते बाबासाहेब डावखर यांचे बंधू तर अनिल डावखर व अरुण डावखर यांचे वडील होत.

पान १ वरुन

## पाकिस्तानी सैन्यात खळबळ

मुनीरवर दहशतवादी संघटनांमार्फत काश्मीरमधील पहलगाममध्ये हल्ला केल्याचा आरोप आहे. अमेरिकेलाही मुनीर अजिबात आवडत नाही. अशा परिस्थितीत, मुनीरचे हे पाऊल उलटे ठरत आहे. भारत-पाकिस्तान सीमेच्या सुरक्षेचे नेतृत्व करणाऱ्या ११ व्या कॉर्प्सचे सर्वोच्च कमांडर लेफ्टनंट जनरल उमर अहमद बुखारी यांनी या संदर्भात लष्कराच्या मुख्यालयाला माहिती पाठवली आहे. त्यांनी अचानक झालेल्या राजीनाम्यांना एक मोठे संकट म्हटले आहे.

असे सांगितले जात आहे की, लष्करी कमांडर स्वतः गोंधळलेले आहेत. एका कॉर्प्समधून दुसऱ्या कॉर्प्समध्ये मनमानी रिपोर्टिंग आणि बदल्या आणि पोस्टिंगमध्ये घराणेशाही याबद्दल अधिकारी आणि सैनिकांमध्ये संताप आहे. वेळेवर पगार न मिळणे आणि कामाच्या वाईट परिस्थितीबद्दलही नाराजी आहे.

पहलगाम हल्ल्यावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव आहे. दरम्यान, पाकिस्तानी लष्करी मुख्यालयाने १२ व्या कॉर्प्स आणि बलुचिस्तान-क्वेट्टामधील इतर कमांडमधील लष्करी अधिकारी आणि सैनिकांना ११ व्या कॉर्प्समध्ये रिपोर्ट करण्यास सांगितले आहे. ११ व्या कॉर्प्स कमांडर लेफ्टनंट जनरल उमर अहमद बुखारी बुखारी हे गेल्या एका वर्षापासून हे कमांड सांभाळत आहेत. पण राजीनाम्यांच्या लाटेमुळे त्यांच्या पायाखालची जमीन सरकत आहे. सैन्यात आघाडी हाताळण्यासाठी अधिकाऱ्यांची कमतरता आहे.

**सैन्यात असंतोष**

दररोज जारी होणाऱ्या नवीन आदेशांमुळे लष्करी कमांडर संतापले आहेत असे म्हटले जात आहे. वारंवार बदलणाऱ्या पोस्टिंग आणि जबाबदाऱ्यांमुळे कुटुंबाचा दबाव वाढला आहे. भारत-पाकिस्तान सीमेची जबाबदारी घेण्यासाठी आघाडीवर तैनात असलेल्या इन्फंट्री रेजिमेंट, माउंटन बटालियन आणि तोफखाना रेजिमेंटमध्ये सैनिकांची कमतरता आहे. पाकिस्तानी सैन्यात तीव्र असंतोष, कमकुवत नेतृत्व आणि लष्करी मनोबलातील घसरण स्पष्टपणे दिसून येते.

**राजीनामा का देत आहात?**

राजीनामा देणाऱ्यांनी सांगितलेली मुख्य कारणे म्हणजे लष्करी कमांडर्सकडून वारंवार बदलणारे आदेश, मानसिक थकवा आणि कुटुंबावरील वाढता दबाव. या संकटाचा परिणाम थेट भारत-पाकिस्तान सीमेवर दिसून येत आहे, जिथे पायदळ रेजिमेंट, उत्तरेकडील प्रदेशातील माउंटन बटालियन आणि आघाडीवर तैनात असलेल्या तोफखाना रेजिमेंटमधील सैनिकांच्या संख्येत मोठी घट झाली आहे. लेफ्टनंट जनरल बुखारी यांनी लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांना या गंभीर परिस्थितीची माहिती दिली. त्याला उत्तर म्हणून, लष्कर मुख्यालयाने कडक भूमिका घेतली आणि म्हटले की या संकटकाळात राजीनामे स्वीकारले जाणार नाहीत कारण ते लष्करी नियमांचे उल्लंघन आहे. राजीनामा देणाऱ्या अधिकारी आणि सैनिकांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. तथापि, मुख्यालयाने राजीनाम्यांची नेमकी संख्या जाहीर करण्यास नकार दिला आहे, ज्यामुळे परिस्थितीच्या गांभीर्याबद्दल आणखी प्रश्न उपस्थित होत आहेत. या संकटामुळे पाकिस्तानी सैन्यातील तीव्र असंतोष, कमकुवत नेतृत्व आणि लष्करी मनोबल कमी असल्याचे उघड झाले.

**१७ पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी**

भारत सरकारने काल सोमवारी १७ पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवर बंदी घातली. यामध्ये गृह मंत्रालयाच्या शिफारशींवरून बंदी घातलेल्या यूट्यूब चॅनेलमध्ये क्रिकेटपटू शोएब अख्तर डॉन न्यूज, डॉन न्यूज, समा टीव्ही, आर्य न्यूज, रफ्तार, द पाकिस्तान रेफरन्स, जिओ न्यूज आणि इतर अनेक चॅनेलचा समावेश आहे.सरकारचे म्हणणे आहे की हे चॅनेल भारत आणि सुरक्षा एजन्सींविरुद्ध खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या चालवत आहेत.

## मंत्रिमंडळ बैठकीसाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित

वित्त अधिकारी शैलेश मोरे, व उपमुख्य कार्यकारी अधिकारी लेखा राजू लाकुडझोडे, समन्वय अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी अरूण उंडे, उपजिल्हाधिकारी भूसंपादन अतुल चोरमारे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, उपचिटणीस गृह शाखा मयूर बेरड, सहाय्यक महसूल अधिकारी स्वप्निल फलटणे, संदेश दिवटे निलेश सोनसळे.

कार्यक्रमस्थळ समिती प्रमुखपदी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरत कुमार बाविस्कर, महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता रमेश पवार, रोजगार हमी विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप सोनकुसळे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब नन्नवरे, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता चव्हाण, सुप्रिया कांबळे, जामखेड नगर परिषदेची सुरेश साळवे, ऊर्जा व कामगार विभागाच्या विद्युत निरीक्षक राजश्री गीते, स्वागत समितीच्या प्रमुखपदी अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, उपविभागीय अधिकारी संगमनेर शैलेश शिंदे, तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय अधिकारी श्रीगोंदा श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार मुदगल, वाहन तर समितीच्या प्रमुख अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, बांधकाम विभाग उपअभियंता शशिकांत सुतार, वाहतूक विभागाची निरीक्षक बाबासाहेब बोरसे, मोटर वाहन निरीक्षक सावंत पाटील, कर्जत नगर पालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षय जायभाय यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

यासह विश्रामगृह व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था व वाहतूक नियोजन, भोजन व्यवस्था, खाद्य पदार्थ तपासणी समिती, वाहन चालक अधिकारी समन्वय समिती, मीडिया समिती, रांगोळी व सजावट, वैद्यकीय सेवा समिती, अग्निशामन व पिण्याचे पाणी स्वच्छता समिती, सुरक्षा पासेस, विद्युत व्यवस्था, तांत्रिक कक्ष, आपत्ती व्यवस्थापन समिती, नोडल अधिकारी या ठिकाणी विविध अधिकाऱ्यांच्या नियुक्त करण्यात आल्या आहेत.

दरम्यान मंत्रीमंडळाची बैठक आधी २९ एप्रिला होती. मात्र, तांत्रिक कारणामुळे ही बैठक ६ मे रोजी असल्याचे सांगण्यात आले. बैठकीबाबत अद्याप निश्चित तारीख जाहीर झालेली नसली तरी जिल्हा प्रशासानाच्यावतीने बैठकीचे नियोजन सुरू आहे. वेगवेगळ्या पातळीवर समितीनिहाय अधिकारी नियोजनात व्यस्त असल्याचे सांगण्यात आले.

**जिल्हाधिकारी आज चौंडीत**

चोंडी येथे होणाऱ्या या बैठकीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह प्रत्येक मंत्र्यासाठी स्वतंत्र अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यासह ६०० व्हिआयपी आणि अन्य दोन हजार व्यक्तीसाठी भोजन, पाणी अन्य व्यवस्था करण्यात आलेली आहे. दरम्यान, बैठकीच्या पूर्व तयारीसाठी आज जिल्हाधिकारी डॉ. पंकज आसिया स्वत: चोंडीला जात त्या ठिकाणी आढावा घेण्यार आहे. साधारणपणे ६ मे रोजी बैठक होईल, त्यादृष्टीने नियोजन सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## दाखल पात्र विद्यार्थ्यांसोबत निरक्षर व्यक्ती शोधा

कुटुंब कल्याण आदी बाबींचा विकास करण्यासाठी कौशल्य विकसित केले जाणार आहे. यामाध्यमातून निरक्षरांना साक्षर केले जाणार आहे. उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना साक्षर करणे आहे. नवसाक्षर लोकांना वाचणे, लिहिणे याच बरोबर गणित, बँकेचे व्यवहार येणे आवश्यक आहे. जिल्ह्यात साक्षरतेची टक्केवारी वाढण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गजेचे आहे. निरक्षर नागरिकांना साक्षर बनवून त्यांचे सक्षमीकरण होणे महत्वाचे आहे. राज्य शासन अनेक महत्वपूर्ण योजना राबवित आहे. याचाच हा एक भाग आहे. विशेष म्हणजे, मार्च २०२५ मध्ये निरक्षरांची परीक्षा घेण्यात आली. या परिक्षेचा निकालही लागला आहे.

प्रौढ नवसाक्षरांसाठी निरंतर शिकण्याच्या प्रक्रियेतील एक भाग म्हणून देशातील १५ वर्षे आणि त्यावरील वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित केली जाणार आहेत. त्याची अंमलबजावणी केंद्र आणि राज्य, केंद्रशासित प्रदेश स्तरावरील संबंधित विभागाच्या साहाय्याने केली जात आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, गटस्तरीय, शाळास्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. दरम्यान, नगर जिल्ह्यात असाक्षर असणाऱ्या ३२ हजार २० नागरिकांना साक्षर करण्याचे उद्दिष्टे देण्यात आलेले आहे. निरक्षरांसाठी यंदाचे शैक्षणिक वर्ष सुरू होण्या आधी म्हणजे १५ जूनपूर्वी विशेष मोहिम राबवण्यात येणार आहे. दरवर्षी जिल्ह्यात पहिले तर आठवीपर्यंतच्या सर्व इयत्तेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांना दाखल पात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात येते. यंदा या सर्वेक्षणासोबत निरक्षर असणाऱ्या व्यक्तीसाठी शोध मोहिम राबवण्यासाठी त्यांना साक्षर करण्यासाठी त्यांची नोंदणी करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागात (योजना) यांच्यावतीने सांगण्यात आले.

## ५० न्यायाधीश निवासस्थानांसाठी पासष्ठ कोटींच्या खर्चास मंजुरी

कुटुंब आलेली होती. तद्नंतर सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. सदरहू प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

## राजूरमध्ये आरोग्य विभाग अलर्ट मोडवर!

संगमनेर या ठिकाणी उपचार सुरू आहेत. गावात सध्या आरोग्य विभागाच्या ३५ पथके कार्यरत असून ते घरोघरी जावून नागरिकांना पाणी उकळून प्यावे आणि आजाराशी काही लक्षणे दिसून आल्यास गरजेनूसार पुढील वैद्यकीय उपचार करण्यात येत असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे यांनी सांगितले. या ठिकाणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी भेट दिली असून गावात दुषित झालेल्या पाणी स्त्रोताची पाहणी त्यांनी केली. तसेच गावातील पाणी शुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित करून घेतला असल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले. सध्या राजूर गावात ३५ पथकात ५० आरोग्य सेवक, ९ आशा सेविका, १० सुपरवायजर आणि १० मेडिकला ऑफिसर काविळच्या उद्रेकावर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न करत आहेत.

## एटीएममधून पैसे काढणे १ मेपासून महागणार

नॉन-मेट्रो शहरांमध्ये इतर बँकेच्या एटीएमवर ५ मोफत व्यवहार

हे सर्व नियम भारतातील सर्व बँकांच्या बचत खात्यांसाठी लागू आहेत.

मोफत व्यवहारामध्ये रोख पैसे काढणे, शिल्लक तपासणी आणि मिनी-स्टेटमेंट घेणे यांचा समावेश होतो.

**शुल्कवाढीचे कारण:**

बँका आणि एटीएम ऑपरेटर्सकडून वाढत्या ऑपरेटिंग खर्चामुळे शुल्कवाढीची मागणी दीर्घकाळपासून केली जात होती. अखेर नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया च्या शिफारशीवरून रिझर्व्ह बँकेने ही वाढ मंजूर केली आहे.

## लेक यूपीएससी पास, पेढे वाटताना वडिलांना हार्टअटॅकने मृत्यू

होणार या बातमीने सुखावलेल्या वडिलांनी गावकऱ्यांना पेढे वाटायला सुरुवात केली .ग्रामस्थांना पेढे वाटतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला .यातच त्यांचा मृत्यू झाला .एकीकडे मुलीचा आनंदाचा दिवस दुसरीकडे वडिलांच्या मृत्यूने क्षणार्धात कुटुंब पोरकं झालं . प्रल्हाद खंदारे असे मोहिनीच्या वडिलांचे नाव आहे .पुसद पंचायत समिती बुलढाणा येथे ते सेवानिवृत्त विस्तार अधिकारी होते . त्यांच्या मृत्यूने सारा गाव हळहळलाय.

खंदारे हे पुसद पंचायत समितीचे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी असून त्यांची मुलगी मोहिनी हिला केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगली रँक मिळाली. हा आनंदोत्सव साजरा करताना प्रल्हाद खंदारे हे ग्रामस्थांना पेढे वाटत होते. या वेळी खंदारे यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे खंदारे परिवारावर आनंदाच्या क्षणी दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मोहिनी खंदारेने पुण्यात कोचिंग क्लासेस करत आपल्या अभ्यासावर भर देत हे यश मिळवले आहे. याआधी २०२१ मध्ये एमपीएससी परीक्षेत यशस्वी झाली होती.

## दहशतवाद्यांवर कारवाई करा, पाकला अप्रत्यक्ष संदेश

पीडित, भारत आणि नेपाळ सरकारसोबत आम्ही उभे आहोत असे सुरक्षा परिषदेने एक वक्तव्य जारी करत म्हटले आहे.

सुरक्षा परिषदेने सर्व सदस्य देशांना आंतरराष्ट्रीय कायदे आणि सुरक्षा परिषदेच्या प्रस्तावांनुरुप निर्धारित जबाबदाऱ्यांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.